
वनराई पोलीस ठाणे, मुंबई.
दिनांक : ०७/१०/२०२६.

वार्तापत्र (PRESS NOTE)



(अवैद्यरित्या ज्वलनशिल (ॲसिडसदृश) पदार्थ कारखान्यामध्ये ठेवुन काम करण्याकरिता वापर करणा—याएस एंटरप्रायजेस कंपनीवर कारवाई केल्याबाबत)

गु.र.क ७२१/२०२६ कलम २८७ भा.न्या.स. सह कलम ३७ (१) (ब), १३५ म पो अधिनियम

दि.०६/१०/२०२६ रोजी पोउनि प्रदिप शिंदे, व ए.टी.सी. पथक यांना गुप्त बामतीदाराने दिलेल्या माहितीप्रमाणे आण्णा नगर, कामा इस्टेट, वालभटट रोड, गोरेगाव पुर्व, मुंबई येथे मेसर्स.एस एस एंटरप्रायजेस या नावाचा स्टील चे प्लेट पॉलिशिग व शाईनिंगचे काम करण्याचा कारखाना असुन सदर कारखान्यामध्ये ॲसिड ने भरलेले प्लॅस्टिक चे कॅन अविचाराने व हयगयीने मनुष्याच्या जिवितास दुखापत होईल अशा रितीने हयगयीने ठेवले आहेत.

सदर बातमीची शहानिशा करुन वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखली त्यावर कारवाई करण्यासाठी आण्णा नगर, कामा इस्टेट, वालभटट रोड, गोरेगाव पुर्व, मुंबई येथील एस एस एंटरप्रायजेस कारखान्यात पोहचलो. सदर कारखाना हा १० फुट रुंदी व २० फुटाची लांबी असलेली रुम असुन सदर कारखान्यामध्ये त्यामध्ये तीन टॅंकमध्ये स्टील चे प्लेट पॉलिशिग व शाईनिंगचे काम ॲसिड मिश्रीत द्रावणामध्ये करीत असल्याचे दिसुन आले. तसेच मध्यभागी ०२ काळया रंगाचे प्रत्येकी ४० लिटर क्षमतेचे प्लॅस्टिकचे कॅन भरलेले दिसुन आले. याच वेळी एक इसम समोर आला असता त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता **नितीन कमलाप्रसाद सिंह, वय २७ वर्षे, धंदा-व्यवसाय** ,रा.ठी. रुम नं ८८, आण्णा नगर कामा इस्टेट, वालभटट रोड, गोरेगाव पुर्व, मुंबई सदर कॅनमध्ये ॲसिड हा ज्वलनशिल पदार्थ असल्याचे त्याने सांगितले. सदर ठिकाणी स्वखुषीने आलेल्या पंचानी व पोलीसांनी सदर कॅनचे टोपण उघडुन बघितले असता त्याचा उग्रवास व त्यामधुन वाफा बाहेर येत असल्याचे दिसुन आले. सदर कारखान्यामध्ये आसपास पाहणी केली असता कोठे ही ॲसिड या ज्वलनशिल पदार्था बाबत घेण्यात येणारी सुरक्षितता कामी असणारे साहित्य दिसुन आले नाही.

ॲसिड हा ज्वलनशिल पदार्थ ठेवण्याकरिता आवश्यक बृहन्मुंबई महानगरपालिकेचा परवाना व इतर आवश्यक परवाने नसताना ॲसिड हा ज्वलनशिल पदार्थ मनुष्याच्या जिवितास दुखापत अगर नुकसान बहुतकरुन होईल हे उमजून हयगयीने पुरता बंदोबस्त न करता करखान्यात ठेवुन वापर केला याकरीता

Scanned with CamScanner

वनराई पोलीस ठाणे,मुंबई गु.र.क्र ७२१/२०२६ कलम २८७ भा.न्या.स. सह कलम ३७ (१) (ब), १३५ म पो अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची उल्लेखनिय कारवाई मागदर्शक मा.पोलीस आयुक्त,मा.पोलीस सह आयुक्त (का व सु)मा.अपर पोलीस आयुक्त,उत्तर प्रादेशिक विभाग,मुंबई , मा.पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ ३,मुंबई मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,दिडोंशी विभाग,मुंबई, वपोनि.श्री.अब्दुल रऊफ शेख,पोनि.सुभाषचंद्र पोस्टुरे, पो.नि.संदिप वाघमारे ,पोउनि.प्रदिप शिंदे, पोहक्र.०४१२७७ संतोष तेली,पोशिक्र.१४००७३ निलेश शिंदे , यांनी बजावली आहे.

Scanned with CamScanner